माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२५/M/०००७६२**

**अपिलार्थी श्री. हनमंत रामकिशन शेटे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी**

आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान,
सार्वजनिक आरोग्य विभाग, आरोग्य भवन, ३ रा मजला,
सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई- ०१.

**प्रथम अपिलीय अधिकारी**

आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान,
सार्वजनिक आरोग्य विभाग, आरोग्य भवन, ३ रा मजला,
सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई- ०१.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०४.०५.२०२६**

अपीलकर्ता : उपस्थित (Video Conference द्वारे)
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २८.१२.२०२४ | - | ३०.०१.२०२५ | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २५.०३.२०२५ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलार्थींनी दि. २८.१२.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार डॉ. अर्चना भोसले, किर्दक, उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर मंडळ, लातूर यांचे आपल्या कार्यालयाकडे पाठविलेल्या १) पत्र क्र. ३२९०४-०६ दि.२७.०८.२०२४ आणि २) पत्र क्र. ४२१२७-२९ दि. ११.११.२०२४ या पत्रावर आपल्या कार्यालयाकडून केलेल्या कार्यवाहीची माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही उत्तर न दिल्याने अपिलार्थींनी दि. ३०.०१.२०२५ रोजी प्रथम अपील दाखल केले.

३. अपिलार्थी यांनी द्वितीय अपीलाची सुनावणी Video Conference द्वारे घेण्याची आयोगास विनंती केली. अपिलार्थींची विनंती मान्य करण्यात येत आहे. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी Video Conference द्वारे उपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सदर प्रकरणी कोणतेही आदेश पारित करण्याअगोदर जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थींना आवश्यक असलेल्या माहितीसह उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १९.०५.२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai सत्यमेव जयते

प्रदीप व्यास ४-५-२०२६

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ०४.०५.२०२६**